CNR No. MHRG040014302024

## विशेष दिवाणी दावा क्र.२००/२०२४ निशाणी क्र.२६ वरील आदेश:-

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.३२ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादींनी सदरहू दावा दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या कराराची विशेष पुर्तता करून मिळण्यासाठी, दावा भुखंडाची नोंदणीकृत त्रिपक्षीय करार होण्याकरिता, दावा भुखंडाचा ताबाकब्जा मिळण्याकरिता, दावा भुखंडावर प्रतिवादी क्र.६ यांचा हक्क हितसंबंध नाही असे जाहीर ठराव करून मिळण्याकरिता व मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, फॉर्म ४७ व ४८ च्या तरतुदीप्रमाणे नसल्याने बाधा आहे. दावा मिळकतीचे संपादनाच्या मोबदल्यात मिळणाऱ्या भुखंडाबाबत प्रतिवादी क्र.६ यांना हक्क व अधिकार नसल्याचे जाहीर ठराव करून मागितला असुन प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे कुलमुखत्यारी म्हणुन वादी क्र.१ यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन क्र.१२२७३/२०२२ दाखल केलेले आहे. कालांतराने कुलमुखत्यारपत्र रद्द केल्याचे कथन करून मा. मुंबई उच्च न्यायालय येथे सदर रिट पिटीशनमध्ये त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. रिट पिटीशनमध्ये सारखाच रिलीफ मागितलेला असुन रिट पिटीशन प्रलंबित आहे. मा. उच्च न्यायालय यांनी म्हणणे मांडण्याचे आदेश केलेले असुन सदर भुखंडाबाबत सिडकोने सर्व

संबंधितांना संधी देऊन त्यांचे म्हणणे ऐकुन भुखंडाबाबत योग्य निर्णय घेण्याचे आदेश केलेले आहेत. सिडकोने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. वादींनी दाव्यात प्रतिवादी क्र.६ यांच्या हक्काबाबत आदेश करून मागितलेले असल्याने दावा प्रिमॅच्युअर लिटीगेशन असल्याने दाव्यास कायद्याची बाधा आहे. वादी हे दावा संपादीत मिळकतीबाबत झालेला अॅवॉर्ड जाहीर करण्याच्या पध्दतीबाबत आक्षेप घेतलेला असुन सदर अॅवॉर्ड चुकीचा असल्याचे कथन केल्यावरून वादी दावा संपादीत मिळकतीबाबतचा अॅवॉर्ड आव्हानीत करीत आहेत. कायद्यातील तरतुदीप्रमाणे वादींनी दावा मिळकतीबाबतचा अॅवॉर्ड आव्हानीत करण्यासाठी दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याबाबतचे अधिकार नाहीत. सदरकामी वादींनी मा. उच्च न्यायालय येथे दाद मागणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्यास कायदेशीर बाधा निर्माण होते. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे पुर्वज सुलोचना चंद्रकांत देशमुख यांच्यात दिनांक २५/०२/२००५ रोजी भुखंड विक्री करारनामा झाल्याचे दाव्यात कथन केलेले असुन करारातील पान क्र.६ वरील अट क्र.१७ मध्ये सदर कराराची पुर्तता होईपर्यंत जर एकपक्षी व दुसरेपक्षी यांच्या दरम्यान कोणत्याही विषयावर वाद निर्माण झाल्यास सदर वादावर निवाडा देण्यासाठी यांची लवाद म्हणुन नेमणुक केली असुन त्यांनी दिलेला निवाडा हा अंतिम असुन तो एकपक्षीय व दुसरेपक्षीय यांच्यावर बंधनकारक राहील व लवादाने दिलेला निवाडा हा भारतीय लवाद कायद्यातील तरतुदीनुसार असल्याची तरतुद आहे. सदर तरतुद असल्याने दाव्यास लवाद कायद्यातील तरतुदीची बाधा निर्माण होते. करारात प्रतिवादी क्र.६ हे पक्षकार म्हणुन समाविष्ट नसुन सदर व्यवहारात साक्षीदार नाहीत, तसेच प्रतिवादी क्र.६ यांना सदर व्यवहारात कोणताही मोबदला मिळालेला नाही, त्यामुळे दाव्यात प्रतिवादी क्र.६ हे आवश्यक पक्षकार होत नाहीत. वादींनी प्रतिवादी क्र.६ यांना दाव्यात

प्रतिवादी म्हणुन समाविष्ट केल्याने दाव्यास अनावश्यक पक्षकार या तत्वाची बाधा निर्माण होते. वादी व प्रतिवादी यांच्यात प्रिव्हीटी ऑफ कॉन्ट्रॅक्ट नसल्याने दाव्यास कायद्याची बाधा निर्माण होते. दाव्यास इतर काही कायद्यातील तरतुदींची बाधा निर्माण होते व दावा चालण्याजोगा नसल्याने खर्चासहीत फेटाळण्यात यावा.

३. वादींनी निशाणी क्र.३२ वरील त्यांच्या जबाबात नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.६ यांनी नमुद केलेल्या दिवाणी प्रक्रिया संहितेचे फॉर्म क्र.४७ व ४८ मधील तरतुदी मँडेटरी स्वरूपाच्या नसुन वादींनी दाव्यात आवश्यक तो संपुर्ण तपशील सविस्तरपणे दिलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांची आई सुलोचना चंद्रकांत देशमुख यांचे कुलअखत्यारी म्हणुन वादी क्र.१ यांनी मौजे उलवे येथील सेक्टर १७ भुखंड क्र.१७८अ, क्षेत्र ८०० चौ.मी. या भुखंडाचे सुलोचना चंद्रकांत देशमुख यांच्या लाभात भाडेपट्टा करारनामा करण्याकरिता मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन क्र.१२२७३/२०२२ दाखल केले होते. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी क्र.१ यांच्या लाभातील कुलअखत्यारपत्र काही दिवसांपुर्वी रद्द केल्यानंतर वादींनी सदर रिट पिटीशनमध्ये त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्याकरिता अर्ज दिला. प्रतिवादी क्र.६ यांनी ते कुळ असल्याबाबत ठराव होण्याकरिता व इतर मागण्यांकरिता मा. मुंबई उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन क्र.१४५८४/२०२२ दाखल केले होते. सदर रिट पिटीशनमध्ये वादींनी त्यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्याकरिता अर्ज दिला होता. दोन्ही रिट पिटीशन अनुक्रमे प्रतिवादी क्र.१ ते ५, प्रतिवादी क्र.६ यांनी दाखल केले होते. मा. मुंबई उच्च न्यायालय यांची दिनांक २९/०४/२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदर दोन्ही रिट पिटीशन निकाली काढण्यात आली. वादींनी दाव्यातील परिच्छेद क्र.३०, ३१ मध्ये व अन्य

ठिकाणी प्रतिवादी क्र.६ यांच्या लाभात केलेला ॲवॉर्ड चुकीचा व बेकायदेशीर असल्याबाबत विधाने केलेली असली तरी वादींनी विनंती परिच्छेद क्र.६१ मध्ये कोठेही ॲवॉर्ड आव्हानीत करण्याबाबत जाहीर ठरावाविषयी अगर अन्य कोणतीही विनंती केलेली नसल्याने दाव्यास कोणतीही कायदेशीर बाधा निर्माण झालेली नाही. वादींनी दावा प्रतिवादी क्र.१ ते ५ यांची आई सुलोचना चंद्रकांत देशमुख व प्रतिवादी क्र.१ जयवंत चंद्रकांत देशमुख यांनी वादी क्र.१ ते ३ यांच्या लाभात लिहुन दिलेल्या दिनांक ०९/०५/२०१६ रोजीचे भुखंड विक्री करार तथा भाडेपट्टा हक्क तबदील करण्याचा करार याची विशेष पुर्तता करून मिळण्याकरिता व अन्य विनंत्यांकरिता दाखल केलेला आहे. वादींचा दावा दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या करारावर विसंबुन दाखल केलेला आहे. कराराचे अवलोकन केल्यास त्यात आर्बिट्रेशनची कोणतीही व्यवस्था नाही. दाव्यात दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या कराराअगोदर झालेल्या दिनांक २५/०२/२००५ रोजीच्या कराराचा व त्यानंतर दिनांक १२/११/२००९ रोजीचे करारासंबंधी कथन केलेले असले तरी वादी दाव्यात दिनांक २५/०२/२००५ रोजीचे व दिनांक १२/११/२००९ रोजीच्या विशेष कराराची पुर्तता करून मागत नसुन दिनांक २५/०२/२००५ रोजीच्या करारात संबंधित पक्षकारांमध्ये वाद निर्माण झाल्यास निवाडा होण्यासाठी लवादाची नेमणुक केली जाईल अशी व्यवस्था असली तरी सदरहू दावा दिनांक २५/०२/२००५ रोजीच्या कराराची विशेष पुर्तता करून मिळण्याकरिता दाखल झालेला नसल्याने सदर व्यवस्था गैरलागु झाली आहे. वादींनी दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या करारात प्रतिवादी क्र.६हे पक्षकार म्हणुन समाविष्ट असल्याबाबत कथन केलेले नसुन दावा भुखंड ज्या संपादीत मिळकतीसंदर्भात ॲलॉट झालेला आहे त्या संपादीत मिळकतीवर

प्रतिवादी क्र.६ यांचा कोणताही कुळहक्क अगर अन्य कोणताही हितसंबंध कधीही नव्हता. प्रतिवादी क्र.६ यांनी खोटेपणाने दावा भुखंडावर हक्क सांगण्यास सुरूवात केल्यानंतर प्रतिवादी क्र.६ यांनी विशेष भुसंपादन अधिकारी मेट्रो सेंटर क्र.३, पनवेल यांचेसमोर दिलेला जबाब विचारात घेता त्यांचा संपादीत मिळकतीवर कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. विशेष भुसंपादन अधिकारी, मेट्रो सेंटर क्र.३, पनवेल यांनी दिनांक २६/१२/२००७ रोजी मुख्य भुमी व भुमापन अधिकारी, सिडको यांना पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र.६ यांचा संपादीत मिळकतीवर हक्क व हितसंबंध नसल्याचे सिध्द झाले असताना प्रतिवादी क्र.६ हे दावा भुखंडाचे ॲलॉटमेंट सिडकोकडून घेण्याचा प्रयत्न करू लागले व दावा भुखंडात त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करू लागल्याने त्यांना दाव्याच्या कामकाजात आवश्यक पार्टी म्हणुन समाविष्ट करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.६ हे दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या करारात पक्षकार नसले तरी प्रतिवादी क्र.१ ते ५ व प्रतिवादी क्र.६ यांनी संगनमत करून वादींच्या लाभात दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या करारात दावा भुखंडात निर्माण झालेले हक्क व हितसंबंध नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू केला.

४. प्रतिवादी क्र.६ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, फॉर्म क्र.४७ व ४८ च्या तरतुदीप्रमाणे नसल्याने बाधा असुन रिट पिटीशन क्र.१२२७३/२०२२ प्रलंबित असुन सदर दावा प्रिमॅच्युअर लिटीगेशन आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, वादींनी ॲवॉर्ड जाहीर करण्याच्या पध्दतीबाबत व ॲवॉर्ड चुकीचा असल्याचे कथन केले असुन ॲवॉर्ड आव्हानीत करीत असल्याने दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याचे अधिकार नसुन दिनांक २५/०२/२००५ रोजीच्या करारात लवादाची तरतुद असुन दाव्यास लवाद कायद्यातील तरतुदींची बाधा

निर्माण होते. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, प्रतिवादी क्र.६ हे करारात पक्षकार म्हणुन समाविष्ट नसुन साक्षीदार नाहीत व प्रतिवादी क्र.६ यांना सदर व्यवहारात मोबदला मिळालेला नाही व प्रतिवादी क्र.६ हे दाव्यात आवश्यक पक्षकार नसुन दाव्यास इतर काही कायद्यातील तरतुदींची बाधा निर्माण होत असल्याने दावा खर्चासह फेटाळण्यात यावा. त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा निर्वाळा दिला.

1) **Smt. Pushpa w/o. Aidan Kalantri & Ors. V. Purushottam Champalalji Rathi, 2010(3) ALL MR 70,** wherein, the Hon'ble Bombay High Court (Nagpur Bench) observed that,

> *"Real cause of action not set out in plaint. Plaint, therefore, liable to be rejected under O.7 R.11(a) of Civil P.C.".*

2) **The Church of Christ Charitable Trust and Educational Charitable Society rep. by its Chairman V. M/s. Ponniamman Educational Trust rep. by its Chairperson/Managing Trustee, AIR 2012 SUPREME COURT 3912,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Cause of action means bundle of facts which taken with law applicable to them gives plaintiff right to relief against defendant.".*

3) **Rajendra Bajoria and Ors. V. V. Hemant Kumar Jalan and Ors., AIR 2021 SUPREME COURT 4594,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Averments in plaint not disclosing cause of action and reliefs as sought in plaint cannot be granted to plaintiff. Rejection of plaint is proper."*

4) **Ameet Lalchand Shah and Ors. V. Rishabh Enterprises and Anr., AIR 2018 SUPREME COURT 3041,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Parties involved in single commercial project (solar plant) executed through several agreements. Equipment Lease Agreement is main agreement whereas other agreements are ancillary agreements leading to main purpose of commissioning of solar plant. All agreements are inter-connected and parties covered by arbitration clause in main agreement."*

5) **P. R. Subramania V. Lakshmi Ammal Lakshmi Ammal (dead) by her Legal representatives, AIR 1974 SUPREME COURT 1930,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Plaintiff cannot have a personal decree against those who were not parties to the suit promissory note."*

**6) Prakash Ramkrishna Khadse and Ors. V. Manikrao Ramaji Sonawane and Ors., 2010(1) AIR Bom R 657,** wherein, the Hon'ble Bombay High Court (Nagpur Bench) observed that,

> *“Suit filed by person not having privity of contract and who cannot enforce it. Would be bad and liable to be dismissed on this count alone.”*

**7) Kesaba Behera V. Chinari Swapnarani Subudhi and another, Law Finder Doc Id # 1426803** wherein, the Hon'ble Orissa High Court observed that,

> *“Third party to the agreement in question is neither a proper nor a necessary party to this suit. Hence, can’t be permitted to be arrayed as party.”*

५. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, दिवाणी प्रक्रिया संहितेचे फॉर्म क्र.४७ व ४८ मधील तरतुदी मँडेटरी स्वरूपाच्या नसुन दाव्यात आवश्यक तो तपशील नमुद केलेला असुन दोन रिट पिटीशन क्र.१२२७३/२०२२ व १४५८४/२०२२ हे निकाली काढण्यात आले असुन वादींनी अॅवॉर्ड आव्हानीत करण्याबाबत जाहीर ठरावाविषयी किंवा अन्य कोणतीही विनंती केलेली नसुन दावा दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या करारावर विसंबुन दाखल केलेला आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, दावा दिनांक २५/०२/२००५ रोजीच्या विशेष कराराची पुर्तता करून मिळण्याकरिता दाखल झालेला नसुन आर्बिट्रेशन अॅक्टचे कलम ८ मधील तरतुदींप्रमाणे कायद्यात बाधा निर्माण होत नसुन प्रतिवादी क्र.६ यांनी

खोटेपणाने भुखंडावर हक्क सांगण्यास सुरूवात केल्याने व दावा भुखंडाचे ॲलॉटमेंट सिडकोकडून घेण्याचा, तसेच भुखंडात त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करू लागल्याने त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ट करण्यात आलेले आहे.

६. प्रस्तुत प्रकरणात वादींनी दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या भुखंड विक्रीचा करार तथा भाडेपट्टयाचे हक्क तबदील करण्याच्या करारात ठरल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादींबरोबर दावा भुखंडाचा ठरलेला व्यवहार पुर्ण करून देण्याविषयी, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दावा भुखंडाचे नोंदणीकृत भाडेपट्टा करार सिडकोकडून करून घेण्याविषयी दावा भुखंडाचे नोंदणीकृत त्रिपक्षीय करार वादींच्या लाभात करून देण्याविषयी दावा भुखंडाचा खुला व शांततामय ताबेकब्जा वादींना देण्याविषयी आदेश होण्याकरिता, प्रतिवादी क्र.६ यांचा दावा भुखंडावर कोणताही हक्क हितसंबंध नाही असा जाहीर ठराव होण्याकरिता व प्रतिवादी क्र.६ यांनी दावा भुखंडाची अगर दावा भुखंडापैकी कोणत्याही क्षेत्राचे ॲलॉटमेंट सिडकोकडून घेऊ नये व दावा भुखंडाचे अगर दावा भुखंडापैकी कोणत्याही क्षेत्राची नोंदणीकृत भाडेपट्टा करार सिडको अधिकाऱ्यांकडून करून घेऊ नये, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी दावा भुखंडात कोणत्याही त्रयस्थ इसमाच्या लाभात कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध निर्माण करू नये, दावा भुखंडात कोणत्याही प्रकारचे बांधकाम सुरू करू नये असे निरंतर मनाई हुकूमाचे आदेश मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे ऑर्डर ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे. उपरोक्त न्यायनिर्णयातील बाबी या हातातील प्रकरणातील बाबींपेक्षा निराळ्या असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय हातातील प्रकरणास लागु होत नाही.

७. प्रतिवादी क्र.६ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, फॉर्म क्र.४७ व ४८ च्या तरतुदींची बाधा असुन दावा प्रिमॅच्युअर लिटीगेशन आहे व वादींनी ॲवॉर्ड आव्हानीत केलेले असुन दिवाणी न्यायालयास दावा चालविण्याचे अधिकार नाहीत, तसेच दाव्यास लवाद कायद्यातील तरतुदींची बाधा निर्माण होत असुन प्रतिवादी क्र.६ हे दाव्यास आवश्यक पक्षकार नसल्याने दाव्यास अनावश्यक पक्षकारांची बाधा निर्माण होते व वादी व प्रतिवादी यांच्यात प्रिव्हीटी ऑफ कॉन्ट्रॅक्ट नसुन दाव्यास इतर कायद्यातील तरतुदींची बाधा निर्माण होते. वादींचे वि.अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादी क्र.६ हे आवश्यक पक्षकार असुन रिट पिटीशन निकाली झाले असुन दाव्यास लवाद कायद्याची बाधा नाही. अभिलेखावर संपूर्ण पुरावा आल्याशिवाय व दाव्यातील तोंडी आणि कागदोपत्री पुराव्यांचा विचार केल्याशिवाय याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही.

८. दावा दाखल करण्यास कारण म्हणजे संपूर्ण भौतिक तथ्यांचा समूह असुन दावा दाखल करण्यास कारण आहे अथवा नाही हा वस्तुस्थितीचा प्रश्न असुन वादींनी दाव्यातील परिच्छेद क्र.५८ मध्ये दावा दाखल करण्याचे कारण नमुद केले असुन वादींना प्रथमदर्शनी दावा दाखल करण्यासाठी कारण असल्याचे दिसून येते. दाव्यात तपशील, दावा दाखल करण्याचे कारण, मागण्या प्रथमदर्शनी नमुद केलेल्या असुन दिवाणी प्रक्रिया संहितेतील फॉर्म क्र.४७ व ४८ च्या तरतुदीप्रमाणे दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही.

९. रिट पिटीशन क्र.१२२७३/२०२२ दिनांक २९/०४/२०२४ रोजी निकाली झाल्याचे दिसुन येते. दाव्यातील विनंती

परिच्छेदाचे अवलोकन करता वादींनी अॅवॉर्ड रद्द करण्याची किंवा त्याची वैधता तपासण्याची मागणी केल्याचे दिसुन येत नसुन दावा दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या कराराच्या पुर्ततेसाठी व अनुषंगिक मागण्यांसाठी असल्याचे दिसुन येते. दिनांक ०९/०५/२०१६ च्या करारात लवाद तरतुद असल्याचे दिसुन येत नाही. वादींनी दिनांक ०९/०५/२०१६ रोजीच्या कराराची पुर्ततेची मागणी केली असुन लवाद कराराच्या कलम ८ किंवा इतर तरतुदींची बाधा असल्याचे दिसुन येत नाही. प्रतिवादी क्र.६ हे दावा भुखंडावर हक्क सांगत असुन सिडकोकडून अॅलॉटमेंट मिळविण्याचा प्रयत्न करीत असुन त्रयस्थ इसमांच्या लाभात भुखंड विक्री करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नमुद केले असुन दाव्यात प्रतिवादी क्र.६ यांचेविरूध्द जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमाची मागणी केली असुन प्रथमदर्शनी ते दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सदरहू मुद्दयांबाबत अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्याशिवाय त्याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. दाव्यातील मागणी पाहता त्यासाठी प्रिव्हीटी ऑफ कॉन्ट्रॅक्ट नसल्याने दावा फेटाळण्यास पात्र असल्याचे म्हणणे न्यायोचित होणार नाही. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे दाव्यास कायद्याची बाधा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नसुन अशा परिस्थितीत दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही, परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: आदेश ::**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR Date: 2026.01.23 17:44:28 +0530

पनवेल
दिनांकः २२/०१/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
पनवेल